पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०४

**सभावृत्तांत**

दिनांक – **०७/०१/२०२१** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०७/०१/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.बारणे माया संतोष
५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
६. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा. अरुण जागडे – उप नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी टॅब खरेदी करण्याबाबत. – मा.प्रियांका बारसे , मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळेतील इ.५वी ते इ.८वी. विद्यार्थ्यांसाठी मे.चैताली प्रकाशन मार्फत उपयुक्त शैक्षणिक साहित्य व वेगवेगळया विषयांवरील नकाशे,मॉडेल्स् थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ.८वी विद्यार्थ्यांसाठी मे.चैताली प्रकाशन मार्फत विविध स्पर्धा परिक्षा, MNNS,MTS,सैनिक स्कूल,नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षांसाठी उपयोगी मार्गदर्शक पुस्तके थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकांक्षा फौंडेशन या संस्थेस चालविण्याकरिता देण्यात आलेल्या प्राथमिक शाळांमध्ये संस्थेच्या शिक्षकांसोबत मनपा प्राथमिक शिक्षक घेण्याबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत सन २०२०-२१ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश पी.टी. गणवेश व स्वेटर २६ जानेवारी २०२१ "प्रजासत्ताक दिन' पूर्वी वाटप सुरु करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मनपा स्थापत्य विभागामार्फत महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारती विषयक स्थापत्य् कामे शिक्षण समितीच्या मान्यतेने होणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारिका सस्ते यांचा प्रस्ताव.

-----------

अ) दिनांक ०५/११/२०२० व ११/१२/२०२० रोजी झालेल्या **सभेचा** ( कार्यपत्रिका क्रमांक **०२** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १७/१२/२०२० रोजी झालेल्या **सभेचा** ( कार्यपत्रिका क्रमांक **०३** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. शहरातील अनेक खाजगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोबाईलवर ऑनलाईन पध्दतीने शिक्षण दिले जात आहे. त्याचप्रमाणे आपल्या सर्व मनपा शाळेतील विद्यार्थ्याना ऑनलाईन पध्दतीने शिक्षण देणेत येते परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. काही पालकांची आर्थिक परिस्थिती खूपच हलाकीची असल्याने ते त्यांच्या पाल्यास मोबाईल खरेदी करु शकत नाही. त्यामुळे सदर विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहत आहे. एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये यासाठी मनपा शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यासाठी थेट पध्दतीने टॅब खरेदी करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुण्वत्तावाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने प्राथमिक शाळेतील इ.५वी ते इ.८ वी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य व वेगवेगळया विषयांवरील नकाशे,मॉडेल्स खरेदी केल्यास त्यांना त्याचा अभ्यासासाठी उपयोग होईल. तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होईल. याबाबत मे.चैताली प्रकाशन मार्फत प्रस्ताव प्राप्् झालेला आहे. सदर साहित्याबाबत त्यांनी र.रु.३,०६,०००/- इतका खर्च कळविला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ.५वी ते इ.८वी विद्यार्थ्यांसाठी मे.चैताली प्रकाशन मार्फत उपयुक्् शैक्षणिक साहित्् व् वेगवेगळया विषयांवरील नकाशे, मॉडेल्स थेट पध्दतीने खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने प्राथमिक शाळेतील इ. ८ वी विद्यार्थांसाठी अभ्यासासाठी उपयुक्त विविध स्पर्धा परीक्षा, MNNS,MTS, सैनिक स्कूल,नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षाना उपयोगी मार्गदर्शक पुस्तके खरेदी केल्यास त्यांना त्याचा अभ्यासाठी उपयोग होईल. तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होईल. याबाबत मे.चैताली प्रकाशन मार्फत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे सदर साहित्याबाबत त्यांनी र.रु. २,६०,०००/- इतका खर्च कळविला आहे.तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ. ८ वी विद्यार्थांसाठी अभ्यासासाठी उपयुक्त विविध स्पर्धा परीक्षा, MNNS, MTS, सैनिक स्कूल, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षांसाठी उपयोगी मार्गदर्शक पुस्तके खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती

सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाच मनपा प्राथमिक शाळा ह्या आकांक्षा फौंडेशन या संस्थेस चालविण्याकरिता दिल्या आहेत. सदर संस्थेस दिलेल्या शाळा ह्या अतिशय यशस्वीपणे त्यांनी चालविल्या आहेत. आकांक्षा फौंडेशन मधील शिक्षकांकडून विद्यार्थीना उत्तम प्रकारचे शिक्षण मिळत आहे. सदर संस्थेमध्ये शिक्षण घेतलेले विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतही उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. त्यामुळे शाळेमध्ये प्रवेश मिळण्याकरिता पालकांमध्ये स्पर्धा होत आहे. शाळेचा पट ही खूप वाढला आहे. आकांक्षा फौंडेशन मधील शिक्षकांसोबत मनपा प्राथमिक शाळेतील शिक्षक यांनी एकत्रित काम केल्यास त्याचा फायदा आपल्या सर्व मनपा प्राथमिक शाळेतील विद्यार्थीना होईल. मनपाच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थीचा पट वाढेल. तरी आकांक्षा फौंडेशन व मनपा प्राथमिक शाळेतील शिक्षक यांनी एकत्रित काम करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विद्यार्थीना या वर्षी दिवाळी झाली गणवेश पि टी गणवेश नाही थंडी चालू झाली पण विध्यार्थ्यांना स्वेटर नाही इतक्या वर्षात पहिल्यांदाच विद्यार्थ्यांना सदर साहित्यापासून वंचित ठेवण्याचे काम प्रशासना मार्फत सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात हाय कोर्टात जाणून बुजून जाऊन शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात आहे आतातरी २६ जानेवारी २०२१ “प्रजासत्ताक दिन” आल्याने तसेच उच्च न्यायालय मुंबई अपिलात जाण्यापूर्वी सत्र न्यायालय,पुणे यांच्या निर्देशानुसार प्रशासन व समिती सदस्य यांनी ताब्यात घेतलेले शालेय गणवेश पि टि गणवेश व स्वेटर साहित्य वाटपासाठी तयार असल्याने प्रशासनाने ज्या प्रमाणे दरमहा विद्यार्थीना अन्न धान्य शाळेतून वाटप केले जाते त्यानुसार प्रजासत्ताक दिन जवळ आल्याने व विद्यार्थीमध्ये शाळेची ओढ निर्माण होण्याच्या दृष्टीने तसेच गोर-गरीब विद्यार्थीची शिक्षण व योजना पुरविण्याची जबाबदारी मनपाची असल्याने त्वरित शालेय गणवेश पि टि गणवेश व स्वेटर वाटप करण्यात यावे विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये याची सर्वोतोपरी काळजी घेऊन शालेय गणवेश व पी टी

गणवेश व स्वेटर वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०७/०१/२०२१

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारिका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेचे स्थापत्य विषयक कामकाज उदा.शाळेची इमारत दुरुस्ती, नव्याने शाळा बांधणे इ. कामे स्थापत्य विभागामार्फत करण्यात येतात. या संबंधित कोणतीही माहिती शिक्षण समितीस कळविण्यात येत नाही. वास्तविकता शाळेच्या बाबतीत कोणताही निर्णय घेताना शिक्षण समितीची मान्यता घेणे अपेक्षित आहे. याकामाकरिता येणा-या खर्चासाठी " शाळा स्थापत्य " लेखाशिर्ष नव्याने करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/०८/२०२१
दिनांक : ०८/०१/२००२१



**(अरुण हरिभाऊ जागडे)**
उप नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.